# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

## Pune metropolitan Region Development Authority,Pune

स.नं. १५२ – १५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे – ४११००७

S.No. 152-153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune – 411 007

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: comm@pmrda.gov.in


### अंशत: भोगवटा प्रमाणपत्र

( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.७.६ नुसार )

जा.क्र : बीएमयु/मौ.हिंजवडी/स.नं.२/२ व इतर/प्र.क्र. 1033 / 20-20 दि.०८/०६/२०२१

प्रति,

श्री. धानोबा रामभाऊ साखरे व इतर २ तर्फे

श्री. संकल्प असोसिएट्स भागी संस्थे तर्फे भागी श्री. सुरेश गोपाळ जाधव

पत्ता : अमित समृध्दी अपार्टमेंट, फ्लॅट नं.२०३, १२०४/२३, जे.एम.रोड, पुणे ४११ ००४.

मौजे – हिंजवडी, ता. मुळशी, जि.- पुणे येथील स.नं.२/२,३/२,३/१/१,३/१/२, क्षेत्र १०३९१.०० चौ.मी. या जागेवर इमारतीचे बांधकाम नकाशांना जिल्हाधिकारी कार्यालय, (महसूल शाखा) पुणे यांचेकडील अकृषिक आदेश क्र. PMRDA/NA/SR/२४३/१६, दि. ०३/०२/२०१७ तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिरकण, पुणे यांचेकडील सुधारित विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र जा.क्र.बीएमयु/मौ.हिंजवडी/स.नं.२/२ व इता/प्र.क्र.९३३/१९-२०, दि.१९/०३/२०२० परवानगी देण्यात आली आहे.

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री. गौरव नागपुरे लायसन्स नं. CA/२०१२/५४५८२ परवानाधारक वास्तुविशारद/ स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम अंशत: पूर्ण केले असलेबाबत व इमारत क्र. ए या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत दि. १५/०३/२०२१ रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना सोबतच्या परिशिष्ट ' ब ' मध्ये नमूद केलेले अटींस अधिन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे .

उपयोगात आणावयाच्या इमारतीचे वर्णन

| अ.क्र. | इमारत | मंजूरीप्रमाणे | | प्रत्यक्ष जागेवर | | मजला | मंजूरीप्रमाणे सदनिका संख्या | प्रत्यक्ष जागेवर सदनिका संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजले | बांधकाम क्षेत्र | मजले | बांधकाम क्षेत्र | | | |
| 1. | इमारत ए | पार्किंग + १३ मजले | ५४२५.९७ चौ.मी | पार्किंग + १३ मजले | ५४२५.९७ चौ.मी | पार्किंग | – | – |
| | | | | | | पहिला | १०१ ते १०८ | ०८ |
| | | | | | | दुसरा | २०१ ते २०८ | ०८ |
| | | | | | | तिसरा | ३०१ ते ३०८ | ०८ |
| | | | | | | चौथा | ४०१ ते ४०८ | ०८ |
| | | | | | | पाचवा | ५०१ ते ५०८ | ०८ |
| | | | | | | सहावा | ६०१ ते ६०८ | ०८ |
| | | | | | | सातवा | ७०१ ते ७०८ | ०८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आठवा | ८०१ ते ८०६, रिफ्युज एरिया, ८०८ | ०७ |
| | | | | नववा | ९०१ ते ९०८ | ०८ |
| | | | | दहावा | १००१ ते १००८ | ०८ |
| | | | | अकरावा | ११०१ ते ११०८ | ०८ |
| | | | | बारावा | १२०१ ते १२०८ | ०८ |
| | | | | एकूण सदनिका – ९५ | | |

Pune Metropolitan Regional Development Authority Pune
PMRDA

महानगर आयुक्त

तथा

मुख्य कार्यकारी अधिकारी,

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्येतेने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणेकरीता

प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

१) ग्रामसेवक, मौजे - हिंजवडी, ता मुळशी, जि-पुणे. यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि-०८/०६/२०२१ रोजीचे पत्र क्र. ८३३/९८-२० सोबतचे

परिशिष्ट 'ब'

१) अर्जदार /सदनिका धारक/गाळे धारक यांना उक्त इमारतीमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार / सदनिका धारक यांना सदनिका लगतचा दोन मजले उंचीचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) उंच इमारतीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकाचे मुख्य अग्नीशमन अधिकारी यांनी पत्र.क्र. FFM/१४९, दि- ०८/०२/२०२१ अन्वये दिलेल्या अग्नीशमन नाहरकत प्रमाणपत्रातील अटीं व शर्तींची पुर्तता करणे अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील.

५) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र. ७.१ नुसार सदर प्रकल्पाचे बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार करणेची तसेच भारतीय प्रमाणकानुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन नियोजित बांधकाम करणेची संपूर्ण जबाबदारी जमिनमालक/विकासक यांची असून प्रस्तुत प्रकरणी अर्जदार / जमीन मालक/ विकासक श्री. संकल्प असोसिएट्स तर्फे श्री. सुरेश गोपाळ जाधव यांनी दि -०३/०३/२०२१ रोजी रुपये- ५००/- स्टॅम्प पेपरवर तसे नोटराईज्ड् हमीपत्र क्र.३००/२०२१ सादर केलेले आहे. त्यास अधिन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे. .

६) बांधकाम मंजूरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटीं व शर्ती अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

७) विषयांकित जागेतील उर्वरित इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशानुसार पूर्ण करुन त्यास भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदार /मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक आहे.

८) प्रस्तुत गृहप्रकल्पाकरिता आपण सादर केलेल्या प्रमाणपत्रात नमूद सक्षम प्राधिकरणाने /ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहप्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापूर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

९) सदर प्रकरणी पुढील भोगवटा प्रमाणपत्र घेणेपुर्वी बिनशेती मोजणी नकाशा व एकत्रिकरणाचा ७/१२ सादर करणे अर्जदार / विकासक /जमीनमालक यांचेवर बंधनकारक राहील. तसेच प्रस्तावातील प्रादेशिक योजना रस्त्याखालील क्षेत्राचा ताबा प्राधिकरणाकडे देणे अर्जदार / विकासक /जमीनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

१०) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात रुपांतरण शुल्क, खानगी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

Pune Metropolitan Regional Development Authority
PMRDA

महानगर आयुक्त
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणेकरीता

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने